नियमित फौजदारी खटला नं. ५५१/२०२४
निशाणी- २१

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा जबाब.

मी शपथेवर कथन करते की,

माझे नांवः- अर्चना अशोक पंडित

वयः- २४वर्षे, धंदाः- गृहिणी

राहणार- सुडके मळा सिध्दार्थ नगर, अहमदनगर

सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः-

१. किरण दिनकर शिंदे, त्याची पत्नी सिमा दिनकर शिंदे व त्याची आई वत्सला हे माझ्या घराशेजारी राहत असल्यामुळे मी त्यांना ओळखते. दि. २१/०२/२०२४ रोजी रात्री ८.४५ वा. सुमारास मी व माझा मुलगा रुद्र घरी असताना किरण दिनकर शिंदे माझ्या घरात घुसला व माझ्या समोर आला. तो मला शिवीगाळ करु लागला. मी त्याला शिवीगाळ का करतो असे विचारले असता त्याने मला लाथाबुक्यांनी मारहाण केली, छातीला हात लावला, कपडे फाडले त्यामुळे माझ्या मनाला लज्ञा उत्पन्न होणारे वर्तन केले. त्यामुळे मी आरडा ओरडा केला असता आरोपीने माझे केस धरुन घराच्या बाहेर ओढले. त्यावेळी त्याची पत्नी सिमा शिंदे आणि आई वत्सला शिंदे या दोघी आल्या त्यांनी माझे केस धरुन खाली पाडले. त्यांनी मला लाथाबुक्यांनी मारहाण केली व शिवीगाळ केली. सदर भांडणाचा आवाज ऐकुन माझी बहिण ज्योती भाऊसाहेब गायकवाड भांडण सोडविण्यासाठी आली असता तिला सुध्दा सर्व आरोपींनी लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यामुळे मी पोलीस स्टेशनला गेले. पोलिसांनी मला यादी देऊन सरकारी दवाखान्यात पाठविले. औषधोपचार घेतल्यानंतर मी आरोंपीविरुध्द फिर्याद दिली. मला आता दाखविण्यात आलेली फिर्याद तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि. २२ देण्यात येते. मला आता दाखविण्यात आलेली छापील फिर्याद तीच आहे.त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि. २३ देण्यात येते. माझा न्यायालयात बयान नोंदविण्यात आला होता. सरकारी वकिलांनी फिर्यादीचा फौ. प्र. सं. कलम १६४ प्रमाणेचा बयानाचा बंद लिफाफा उघडण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली. मला आता दाखविण्यात आलेला बयान तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व

बरोबर आहे. त्यास नि. २४ देण्यात येते. त्यानंतर पोलीस माझ्या राहत्या घरी पंचनाम्याकरिता आले होते. पोलिसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा केला. पोलिसांनी माझा हिरव्या रंगाचा टॉप जप्त केला. तो टॉप मला दाखविला असता तो मी ओळखु शकते. सरकारी वकिलांनी मुद्देमालाचा सिलबंद लिफाफा उघडण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली. मला दाखविण्यात आलेला टॉप तोच आहे. तो समोरुन फाटलेला आहे. त्यास वस्तु क्र. 'अ' देण्यात येत आहे. मी आरोपींना ओळखते. ते आज न्यायालया समक्ष उपस्थित नाहीत.

सरतपास पूर्ण.

उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एम. एस. सय्यद यांचेकडूनः-

२. मी तीन वर्षापासुन सिध्दार्थ नगर येथे राहते. माझे दहावी पर्यत शिक्षण झालेले आहे. मला दिशा कळतात. माझ्या घराच्या उत्तरेला किरण दिनकर शिंदे राहतो. दक्षिण बाजुला छोटी बोळ आहे व त्या बोळीला लागुन विमल मावशी राहतात. माझ्या घराच्या समोर रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी राहत असलेला परीसर खुप लोकवस्तीचा आहे. साक्षीदार सांगते, लोकवस्ती मागे आहे व ते समोर रोडवर राहतात. आरोपीच्या शेजारी मनोज साठे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या जवळ परदेशी यांचे किराणा दुकान आहे व त्यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले आहेत. साक्षीदार सांगते, कॅमेरे बंद आहेत. किरण शिंदे याला कार्तीक नावाचा छोटा मुलगा आहे. त्या परिसरात बरीच छोटी मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरासमोरील रस्तावर ही मुले क्रिकेट खेळतात व रोज बॉल माझ्या पत्र्यावर जातो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्र्यावर क्रिकेटचा बॉल जात असल्यामुळे कार्तीकच्या आई वडिलांसोबत माझे बरेचदा वाद झाले.

३. आरोपीचे घर माझी बहिण ज्योतीला घ्यायचे होते का याबाबत मला माहिती नाही. या व्यवहारात काही रक्कम आरोपींनी ज्योतीकडुन घेतली होती का याबाबत मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर कारणावरुन माझी बहिण व माझे बरेचदा आरोपीं सोबत वाद झाले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, क्रिकेट खेळण्याचा वाद व घराच्या वादावरुन माझ्या मनात आरोपी आणि त्याचे परिवारा विरुध्द राग होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी सदर घर लवकरात लवकर ताब्यात दयावे याकरिता मी, माझी बहिण व भावाने मिळुन आरोपीं विरुध्द खोटी फिर्याद दयायचे ठरविले. संकेत बारस्कर आणि योगेश पवार हे माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर भांडणामध्ये माझा टॉप मी

स्वतःहुन फाडला. हे म्हणणे खरे नाही की, सदर टॉप ज्या प्रकारे फाटला आहे तसा टॉप भांडणामध्ये फाटत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर टॉप कुठे कुठे फाटला आहे हे मी फिर्याद देताना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सदर टॉप फार जुना आहे.

४. आरोपीने माझे केस धरुन मला घराबाहेर काढले होते ही बाब मी फिर्याद देताना सांगितली होती. सदर बाब माझ्या फिर्यादमध्ये का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, किरण दिनकर शिंदे हा कधीही माझ्या घरामध्ये घुसला नाही, मला शिवीगाळ केली नाही, मला लाथाबुक्यांनी मारहाण केली नाही, माझ्या छातीला हात लावला नाही, केस धरुन ओढले नाही व माझे कपडे फाडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ व २ यांनी सुध्दा मला शिवीगाळ केली नाही व लाथाबुक्यांनी मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझी बहिण ज्योती हिला शिवीगाळ व मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व आमच्यात असलेल्या वादामुळे मी, माझी बहिण व भाऊ यांनी मिळुन सदर खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घरात घसरुन पडल्यामुळे मला इजा झाली.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष,

(एल. एस. पाढेण)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि. ०५/०३/२०२६.
अहमदनगर.